


दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक ३५ । मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

### वडारवाडी ग्रामपंचायत कार्यालयाच्या खोलीत

## महिलेचा निर्घृण खून; संशयित आरोपी ताब्यात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वडारवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या एका बंदिस्त खोलीत एका महिलेचा डोक्यात पाण्याचा हँडल घालून अत्यंत निर्घृणपणे खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना आज सकाळी घडली. या थरारक घटनेमुळे वडारवाडी आणि संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, भिंगार कॅम्प पोलिसांनी संशयित आरोपी संतोष धोत्रे याला तातडीने ताब्यात घेतले आहे.

वडारवाडी ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात असलेल्या एका खोलीत हा प्रकार घडला. संबंधित महिलेच्या डोक्यावर पाण्याचा हँडल मारून अत्यंत निर्दयीपणे हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात




पडलेल्या या महिलेला उपचारासाठी तात्काळ जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले होते. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता.

घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी फॉरेन्सिक पथकाला पाचारण केले.

या हत्येप्रकरणी पोलिसांनी संतोष धोत्रे या संशयित आरोपीला तत्काळ ताब्यात घेतले आहे. प्राथमिक माहिती आणि स्थानिक चर्चेनुसार, चारित्र्याच्या संशयावरून किंवा वैयक्तिक वादातून हा खून झाला असावा, असा अंदाज वर्तवला जात आहे. मात्र, हत्येचे नेमके कारण अद्याप पोलिसांकडून अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आलेले नाही.

घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. भरदिवसा आणि तेही ग्रामपंचायत कार्यालयासारख्या सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या संतापजनक घटनेमुळे वडारवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### प्रेमदान चौकातील टँकर अपघात प्रकरण

## बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई करा!

**आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन । युवा क्रिकेटपटू यश जाधवच्या मृत्यूनंतर वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह; टँकरची फिटनेस, विमा व कागदपत्रांची तपासणी करण्याची मागणी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील प्रेमदान चौक परिसरात झालेल्या भीषण अपघातात युवा क्रिकेटपटू यश अविनाश जाधव याचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर शहरातील बेशिस्त वाहतूक आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. संबंधित टँकर चालकावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अवजड वाहनांची आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक स्थिती तपासावी आणि शहरात वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या वेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपसभापती वर्षाताई सानप, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक करण कराळे, प्रकाश भागानगरे, पुष्कर कुलकर्णी, निखिल वारे, मनोज दुल्लम, बाळासाहेब पवार, प्रा. माणिकराव विधाते, महेश लोंढे, सुरेश



बनसोडे, संदीप आडोळे, रोहन सानप, मोहित पंजाबी, दत्ता गाडळकर, सोमनाथ जाधव आदी उपस्थित होते.

नगरसेवक करण कराळे यांनी निवेदनात म्हटले की, दोन दिवसांपूर्वी झालेल्या टँकरच्या अपघातात युवा क्रिकेटपटू यश अविनाश जाधव याला आपला जीव गमवावा लागला. ट्रॅक्टर चुकीच्या दिशेने येऊन धडकल्याने हा अपघात झाल्याचे त्यांनी सांगितले. या दुर्दैवी घटनेमुळे शहरातील बेशिस्त वाहतुकीचा प्रश्न किती गंभीर बनला आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

शहरातील रस्त्यांवर वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून वाहन चालविण्याचे प्रकार घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण कराळे यांनी केली.

नगरसेवक निखिल वारे यांनी शहरातील वाहतूक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करताना वाहनचालकांकडून, विशेषतः अवजड वाहनांच्या चालकांकडून, वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप केला. चुकीच्या दिशेने वाहन चालविणे, दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने जाणे तसेच नंबर प्लेट नसलेली वाहने रस्त्यावर धावणे, असे प्रकार ■ पान ४ वर

## कत्तलीसाठी आणलेल्या दहा गोवंशाची संगमनेरमध्ये एलसीबीकडून सुटका



**कारवाई करणारे पथक**

**पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच अंमलदार गणेश लोंढे, राहुल द्वारके, गणेश धोत्रे, अभिजित अरकल, योगेश कर्डीले, अमृत आढाव, विशाल तनपुरे, दिपक जाधव आणि सतिष भवर यांच्या पथकाने ही कारवाई केली.**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** संगमनेर येथे कत्तलीच्या उद्देशाने निर्दयीपणे डांबून ठेवलेल्या १० गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी ३ लाख ४० हजार रुपये किमतीची जनावरे ताब्यात घेतली असून, दोघा आरोपींना अटक केली आहे.

दिनांक २७ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर शहर हद्दीत गस्तीवर असताना गोपनीय माहिती मिळाली की, संगमनेरच्या कादरीनगर, गल्ली नं. ०२ मधील मस्जिदे गौसो रजा समोरील मोकळ्या जागेत व म्हसोबा मंदिराजवळ काही इसमांनी गायी कत्तलीसाठी बांधून ठेवल्या आहेत.

पोलिसांनी तत्काळ या ठिकाणी छापा टाकला असता, तिथे १० गोवंशीय जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने डांबून ठेवलेली आढळली. पोलिसांनी घटनास्थळावरून आदनान असीफ सय्यद (वय २८, रा. देवीगल्ली, मोगलपुरा, संगमनेर) आणि अनस सरवर कुरेशी (वय २४, रा. हावडा ब्रीज, ■ पान ४ वर

## ‘जय भगवान’चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**महंत केशव महाराज, सरिता मुंडे, डॉ. आंधळे, डाळीम्बकर, पालवे, खंडागळे यांचा समावेश ; उद्या संत–महंतांसह मान्यवरांचे हस्ते वितरण**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पाथर्डी–** कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने श्री निंबादैत्य नांदूर (ता. पाथर्डी) येथील जय भगवान युवा प्रतिष्ठानचे वतीने विविध क्षेत्रातील उपक्रमशील व प्रेरणादायी व्यक्ती व संस्थाना देण्यात येणारे यंदाचे ‘‘राज्यस्तरीय कार्य गौरव पुरस्कार’’ प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजिनाथ दहिफळे यांनी जाहीर केले आहे.

निंबादैत्य नांदूर येथील भाऊ–बाबा मंदिर प्रांगणात बुधवार दि. २८ रोजी सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात श्रीक्षेत्र भगवान गड संस्थानचे महंत कृष्णा महाराज शास्त्री, सुदर्शन महाराज शास्त्री, रामदास महाराज शास्त्री, केशव महाराज शास्त्री यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचे हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. तरी या सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन जय भगवान युवा प्रतिष्ठानचे वतीने करण्यात आले आहे.

**पुरस्कार व पुरस्कार्थी असे**

राष्ट्रसंत भगवान बाबा आदर्श वारकरी पुरस्कार : महंत केशव महाराज शास्त्री (हनुमान संस्थान राणेगाव).



आदर्श कार्यगौरव पुरस्कार : सरिता मुंडे ( मंडळाधिकारी, नेवासा), सुजाता खंडागळे (तलाठी, भगुर) डॉ. आदिनाथ आंधळे (बीडीओ , गडचिरोली), आकुंश पालवे (कार्यकारी अभियंता, पीडब्ल्यूडी ), महेश डाळीम्बकर (कायझेन अकॅडमी.

■ पान ४ वर

### घराला कुलूप असल्याची संधी साधत चोरट्यांचा डल्ला

## तब्बल ३ लाख नऊ हजारांचा ऐवज लंपास!

**टाकळी ढोकेश्वर येथील खिलारी वस्तीतील घटना; तीन अनोळखी व्यक्तींविरोधात महिलेची पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद**



तीन संशयित आरोपी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**टाकळी ढोकेश्वर–** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील खिलारी वस्तीमध्ये भरदिवसा घरफोडीची घटना घडली असून, चोरट्यांनी घरातील कपाटाचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने आणि मौल्यवान वस्तूंवर डल्ला मारला आहे. या चोरीमध्ये तब्बल ३ लाख ९ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची फिर्याद मंगल संतोष गोरडे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात दिली आहे.

मिळालेल्या फिर्यादीनुसार, मंगल संतोष गोरडे (वय ४५, रा. खिलारी वस्ती, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) या पती संतोष, आई चंद्रभागा काशिनाथ खिलारी यांच्यासह एकत्र राहतात. त्यांचा शेती व्यवसाय आहे. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घराला कुलूप लावून कुटुंबीय शेतातील कामासाठी गेले होते. दुपारी सुमारे १.१० वाजण्याच्या सुमारास त्या शेतात असताना त्यांच्या घराजवळ तीन अनोळखी व्यक्ती आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घरातील सर्वजण शेतात असल्याची संधी साधून चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटाचे कुलूप तोडून त्यामधील सोन्याचे दागिने व मौल्यवान वस्तू चोरून नेल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या सर्व दागिन्यांची एकूण किंमत अंदाजे ३ लाख ९ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, दुपारी घरी ■ पान ४ वर

## मुळा धरणातील पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवा!

**महापौर गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी । जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन; भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी तातडीने नियोजन करण्याची विनंती**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने मुळा धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून तो पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवावा, अशी मागणी महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. पावसाळ्यातच पाण्याची टंचाई जाणवू लागली असून, हिवाळा आणि उन्हाळा अद्याप बाकी असल्याने आगामी काळातील पाणीपुरवठ्याचे आतापासून नियोजन करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी उपसभापती वर्षाताई सानप, माजी उपमहापौर गीतांजली काळे, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक निखिल वारे, प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, बाळासाहेब बारस्कर, अजिंक्य बोरकर, जितू गंभीर, महेश तवले, महेश लोंढे, दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, मयुरी जाधव, पौर्णिमा गव्हाळे, मोहित पंजाबी, सुनीता भिंगारदिवे, सुजाता पडोळे, सुनीता फुलसौंदर, सुमित लोंढे, मयूर बांगरे, रेवन्नाथ पवार, मयुरी लोंढे यांच्यासह नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, अल निनोच्या पार्श्वभूमीवर मुळा पाटबंधारे



विभागाने पाण्याचे आवर्तन सुरू केले असून, याबाबत वृत्तपत्रांत बातम्याही प्रसिद्ध झाल्या आहेत. शेवगाव व पाथर्डी तालुक्यांतील काही गावांना अद्याप पिण्यासाठी पाणी पोहोचलेले नाही; मात्र नेवासा तालुक्यातील ओढ्यांमधून जायकवाडी धरणात पाणी जात आहे. या टंचाईसदृश परिस्थितीमुळे भविष्यात पाणी संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, शहरी तसेच ग्रामीण भागात पाणीकपात करण्याची वेळ येऊ शकते.

निवेदनानुसार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी मुळा धरणातून आवर्तन सोडण्यात आले, त्या वेळी धरणातील पाणीसाठा २४.६०० दशलक्ष घनफूट होता. त्यावेळी धरणात काही प्रमाणात नवीन पाण्याची आवकही सुरू होती. त्यानंतर जवळपास ६० दिवस खरीप हंगामासाठी आवर्तन सुरू राहिले. त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी होऊन सध्याच्या स्थितीत तो सर्वसाधारणपणे १६.६०० दशलक्ष घनफूट राहिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. म्हणजेच खरीप हंगामाच्या आवर्तनासाठी जवळपास आठ दशलक्ष घनफूट पाण्याचा वापर झाला आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मुळा धरणात सध्या सुमारे १६.५ दशलक्ष घनफूट पाणीसाठा शिल्लक असून, त्यापैकी ४.५ दशलक्ष ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### दिवाळीनिमित्त 'स्वर दीपावली' संगीत कार्यक्रमाचे मंगळवारी आयोजन




**अहिल्यानगर - दिवाळी २०२६ निमित्त दिव्यदृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आयोजित स्वरसृष्टी संगीत मंच यांच्या वतीने ''स्वर दीपावली'' या भव्य संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांग युवक-युवतींच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या सामाजिक उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून, मराठी, हिंदी, भक्तिगीते, गझल तसेच चित्रपट गीतांचा सुरेल आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. हा कार्यक्रम २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सांस्कृतिक सभागृह अहिल्यानगर येथे होणार आहे. कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, दिव्यांग कलाकारांच्या सादरीकरणातून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला जाणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख प्रायोजक म्हणून डॉ.दमन काशीद यांच्यासह विविध संस्था व उद्योजकांनी सहकार्य केले आहे. आयोजकांनी अहिल्यानगर व परिसरातील सर्व नागरिक, संगीतप्रेमी, सामाजिक संस्था, युवक-युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांनी या प्रेरणादायी कार्यक्रमास कुटुंबासह उपस्थित राहून दिव्यांग कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले आहे.अधीक माहिती साठी संपर्क कृष्ण तवले मो.९८५०८८५९४६,सुनिल बाचकर मो.८८८८४९८९९२ सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

# बाणेश्वर तरुण मंडळाच्या सामूहिक महालक्ष्मी श्रीसूक्तम् पाठाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### १२० जोडप्यांचा सहभाग; कन्यापूजन, मातृपूजन आणि कुंकुमार्चनाने नवरात्रोत्सवात धार्मिक वातावरण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवरात्रोत्सवानिमित्त बाणेश्वर तरुण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक महालक्ष्मी श्रीसूक्तम् पाठाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १२० जोडप्यांनी एकाच वेळी श्रीसूक्तम् पाठात सहभाग नोंदविला. यासोबतच कन्यापूजन, मातृपूजन आणि कुंकुमार्चन अशा विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. धार्मिक परंपरा जपत सामूहिक उपासनेच्या माध्यमातून समाजातील नागरिकांना एकत्र आणण्याचा मंडळाचा प्रयत्न या उपक्रमातून अधोरेखित झाला. श्री महालक्ष्मीची आराधना, मंत्रोच्चार, पूजनविधी आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या धार्मिक सोहळ्यात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सामूहिक स्वरूपात पार पडलेल्या या उपक्रमाने धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन यांचा सुंदर संगम घडवून आणला.

बाणेश्वर तरुण मंडळाची धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी परिसरात विशिष्ट ओळख आहे. गणेशोत्सवाच्या काळात मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला सामूहिक अथर्वशीर्ष पाठ हा विशेष आकर्षणाचा विषय ठरला होता. या धार्मिक उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादानंतर नवरात्रोत्सवातही मंडळाने सामूहिक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले. यंदाच्या नवरात्रोत्सवात एकाच वेळी सामूहिक महालक्ष्मी श्रीसूक्तम् पाठ, कन्यापूजन, मातृपूजन आणि कुंकुमार्चन असे विविध धार्मिक विधी आयोजित करण्यात आले. या सर्व उपक्रमांमुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या धार्मिक सोहळ्याचा अनुभव घेता आला. विशेष म्हणजे, प्रत्येक उपक्रमात भाविकांचा सहभाग लक्षणीय होता. श्रीसूक्तम् पाठासाठी जोडप्यांनी एकत्र बसून भक्तिभावाने सहभाग नोंदविला, तर कन्यापूजन आणि मातृपूजनाच्या माध्यमातून स्त्रीशक्तीप्रती आदर व्यक्त करण्यात आला. कुंकुमार्चनाच्या उपक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होत धार्मिक परंपरेप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. मंडळाच्या वतीने धार्मिक कार्यक्रमांचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात येत असल्याने या उपक्रमांमधून सामाजिक सहभागालाही प्रोत्साहन मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या कार्यक्रमातील सामूहिक महालक्ष्मी श्रीसूक्तम् पाठ हे प्रमुख आकर्षण ठरले. एकाच वेळी सुमारे १२० जोडपी श्रीसूक्तम् पाठासाठी बसली होती. सामूहिक स्वरूपात करण्यात आलेल्या या पाठामुळे कार्यक्रमस्थळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले. श्रीसूक्तम् पाठाच्या मराठी अनुवादित सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रांचा अर्थ आणि धार्मिक आशय समजून घेण्याची संधी मिळाली. अमृता बेडेकर, साजेश्री कुलकर्णी, सुवर्णा कुलकर्णी आणि लाजरी जोशी यांनी श्रीसूक्तम् पाठाच्या मराठी अनुवादित सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. धार्मिक मंत्रांचे सामूहिक पठण आणि त्यातून निर्माण झालेली सकारात्मक ऊर्जा यामुळे उपस्थित भाविकांना भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेता आला. पारंपरिक धार्मिक विधींचे महत्त्व जपत सामूहिक उपासनेची परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. धार्मिक कार्यक्रम केवळ विधींपुरते मर्यादित न राहता त्यातून नागरिकांमध्ये एकत्रित सहभागाची भावना निर्माण व्हावी, या दृष्टीनेही या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले.

कार्यक्रमात कन्यापूजनाचा धार्मिक उपक्रमही मोठ्या भक्तिभावाने पार पडला. सुमारे ६० कुमारिकांचे एकाच वेळी कन्यापूजन करण्यात आले. भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्ये कुमारिकांना देवीचे स्वरूप मानून त्यांचा सन्मान करण्याला विशेष महत्त्व आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून कुमारिकांप्रती आदरभाव व्यक्त करण्यात आला. याचबरोबर सुमारे ७५ मातांचे मातृपूजन करण्यात आले. माता ही कुटुंबव्यवस्थेचा आधार असून तिच्या त्यागाचा, प्रेमाचा आणि संस्कारांचा सन्मान करण्याची भावना या उपक्रमातून व्यक्त झाली. मातृपूजनाच्या माध्यमातून मातृत्वाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कन्यापूजन आणि मातृपूजन या दोन्ही धार्मिक उपक्रमांमुळे कार्यक्रमाला सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले. नवरात्रोत्सवात देवीच्या उपासनेबरोबरच स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याची परंपरा जपली जाते. त्याच भावनेतून आयोजित या उपक्रमांना उपस्थित नागरिकांनी प्रतिसाद दिला. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक मूल्ये यांची सांगड घालणारे हे पूजन कार्यक्रम उपस्थितांसाठी विशेष ठरले.

### अहिल्यानगरच्या 'जिव्हाळा प्रतिष्ठान'ला मानाचा

# 'अभिनव साळी संस्था कार्यगौरव पुरस्कार'



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वकुळ साळी समाजाचे श्री जिव्हेश्वर प्रतिष्ठान, पुणे यांच्या २८व्या वर्धापन दिनानिमित्त, रविवार दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता 'साहित्य सम्राट विजय तेंडुलकर नाट्यगृह, पुणे' येथे आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात, अहिल्यानगर येथील 'जिव्हाळा प्रतिष्ठान' या संस्थेला यंदाचा प्रतिष्ठित' अभिनव साळी संस्था कार्यगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. प्रतिष्ठाणनी १३वा वर्धापनदिन नुकताच साजरा केला तसेच संस्थेतर्फे आतापर्यंत आरोग्य शिबीर, नेत्र व देहदान फॉर्म संकलन, गरजुंना धान्य व किराणा वाटप, जेष्ठ नागरीक सन्मान सोहळा, वंचितांसाठी दिपावली फराळ वाटप, वधुवर मेळावा, महिलांसाठी आरोग्य शिबीर, मोफत औषध वाटप, कन्यादान योजना, पुरग्रस्तनिधी अशा उपक्रमानिमित्त मोलाचे कार्य केल्याबद्दल सदाशिव चिंचकर यांच्या हस्ते आणि जिव्हाळा प्रतिष्ठानचे खजिनदार विठ्ठलराव पाठक आणि संस्थेचे उपस्थित संचालक यांनी हा पुरस्कार पुणे स्वीकारला.

या कार्यक्रमास मंचावर व उपस्थित मान्यवरांमध्ये अरुण दळवी, डॉ. नरेंद्र वाव्हळ, सुभाष वाय. पाठक, चंद्रशेखर पिंपरकर, नंदकुमार सुपेकर, श्री जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष अंबर ढगे, आणि कार्याध्यक्ष चंद्रशेखर बारगजे तसेच उमेश कोदे, प्रदीप वाव्हळ, सुधाकर साळी, सौ. उमा पाटेकर, सौ. मिना साळी आणि सौ. मंगल दळवी उपस्थित होते.

सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय आणि प्रामाणिक कार्य केल्याबद्दल जिव्हाळा प्रतिष्ठानचा हा गौरव करण्यात आला आहे, असे संस्थेचे अहिल्यानगरचे अध्यक्ष सुनिल अविनाश पावले यांनी माहिती दिली.

# मुकुंदनगरमध्ये व्यसनमुक्तीसाठी ज्येष्ठ नागरिकांनी उचलला सामाजिक परिवर्तनाचा विडा!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुकुंदनगर, गोविंदपुरा, फकीरवाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत परिसरात व्यसनमुक्ती अभियान राबविणे, अपूर्ण सभागृहाचे काम पूर्ण करणे, ज्येष्ठ विधवा महिला व पुरुषांच्या पुनर्विवाहासाठी पुढाकार घेणे, तसेच संघाच्या कामकाजाला अधिक गतिमान करण्यासाठी नवीन कार्यकारिणी नियुक्त करणे, असे महत्त्वपूर्ण ठराव घेण्यात आले. समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याचा निर्धार या वेळी व्यक्त केला.

सभेला प्रमुख पाहुणे म्हणून मजर गयास मिर्झा, डॉ. जी. पी. शेख, ॲड. हनीफ बाबू



शेख आदी मान्यवर उपस्थित होते. सभेत ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, परिसरातील सामाजिक प्रश्न आणि भविष्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. सभेतील सर्वांत महत्त्वाचा विषय म्हणजे मुकुंदनगर परिसरात व्यसनमुक्ती अभियान राबविणे हा होता. तरुण वर्ग व्यसनाच्या आहारी जात असल्याने त्यांचे संसार उध्वस्त होत आहे. यामुळे व्यक्तीच्या आरोग्यावर, कुटुंबावर आणि सामाजिक जीवनावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता यावेळी व्यक्त करण्यात आली. विशेषतः तरुण पिढी व्यसनांपासून दूर राहावी, कुटुंबांमध्ये व्यसनामुळे निर्माण होणारे प्रश्न कमी व्हावेत आणि परिसरात निरोगी सामाजिक वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने ज्येष्ठ नागरिकांनी पुढाकार घेण्याचे ठरविले आहे.

व्यसनमुक्ती हा केवळ एका व्यक्तीचा किंवा कुटुंबाचा प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या आरोग्याशी आणि भविष्याशी निगडित विषय आहे. त्यामुळे नागरिकांना एकत्र आणून व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगणे, जनजागृती करणे आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी प्रयत्न करणे, या दिशेने संघाच्या माध्यमातून काम करण्याचा निर्धार करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांना एकत्र येण्यासाठी, विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी आणि संघाच्या बैठका घेण्यासाठी सभागृहाची आवश्यकता असते. मात्र, सभागृहाचे काम अद्याप अपूर्ण असल्याने ते पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेण्याचा ठराव सभेत करण्यात आला. सभागृहाचे काम पूर्ण झाल्यास ज्येष्ठ नागरिकांना एकत्रितपणे विविध उपक्रम राबविणे, सामाजिक प्रश्नांवर चर्चा करणे आणि जनहिताचे कार्यक्रम आयोजित करणे अधिक सुलभ होणार आहे.

# प्रकल्पबाधित जमीन वारसांना कसण्यासाठी द्या; शेरे कुटुंबाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण!

### पूर्वजांच्या जमिनीसाठी लढा ११ एकर २३ गुंठे जमिनीचा प्रश्न ऐरणीवर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील मौजे चिकणी खामगाव येथील पूर्वजांची प्रकल्पबाधित जमीन वारसांना कसण्यासाठी मिळावी, तसेच कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या धमक्या देणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, या मागण्यांसाठी शेरे कुटुंबीयांनी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. जमिनीच्या हक्काचा प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस संरक्षण देण्याची मागणीही उपोषणकर्त्यांनी केली आहे.

चिकणी खामगाव येथील गट क्रमांक ५५/२ ड आणि ५६/३ मधील 'महार हडोळे' या नावाने उल्लेख असलेली ११ एकर २३ गुंठे प्रकल्पबाधित जमीन १९६६ च्या शासन निर्णयानुसार वारसांना कसण्यासाठी देण्यात यावी, अशी शेरे कुटुंबीयांची प्रमुख मागणी आहे. पूर्वजांच्या जमिनीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने प्रशासनाने या प्रकरणात लक्ष घालून योग्य निर्णय घ्यावा, अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी मांडली आहे.

या प्रकरणासंदर्भात आशाबाई गोपीनाथ शेरे, लीलाबाई शंकर सुखदान, गोरख गोपीनाथ शेरे, अमोल गोपीनाथ शेरे यांच्यासह कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित कुटुंबीयांच्या जीविताला धोका असल्याचे सांगत त्यांना पोलीस संरक्षण पुरविण्याची मागणी करण्यात आली आहे.

पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यास विनयभंग आणि दरोड्यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये खोट्या केसेस दाखल करण्याची धमकी दिल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच जातीवाचक शिवीगाळ करून गावाबाहेर हाकलून देण्याची, नग्न धिंड काढण्याची धमकी दिल्याचे आणि कुटुंबीयांच्या निवाऱ्याच्या झोपड्या पाडण्यात आल्याचेही उपोषणकर्त्यांनी म्हटले आहे.

या सर्व आरोपांची सखोल चौकशी करून संबंधितांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी गोरख शेरे, अमोल शेरे, आशाबाई शेरे आणि बाबासाहेब शेलार यांनी केली आहे.

जमिनीच्या हक्काचा प्रश्न आणि कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा मुद्दा यावर प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. १९६६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित जमीन अभिलेखांची तपासणी करून वारसांच्या मागणीबाबत योग्य कार्यवाही करावी, तसेच धमक्यांच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

या उपोषणाला चिकणी खामगाव येथील ग्रामस्थांसह अनेक नागरिकांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला. जमीनविषयक मागणीचा न्याय्य निपटारा करून संबंधित कुटुंबीयांना सुरक्षित वातावरण मिळावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासह रोजगाराभिमुख प्रशिक्षणावर भर - डॉ.पारस कोठारी

### दिवसा काम, रात्री शिक्षण; आता संगणक कौशल्यांचीही मिळणार जोड!
### भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या ५७ विद्यार्थ्यांना मासूम संस्थेची संगणक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवसभर अर्थार्जनासाठी धावपळ, कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे आणि या सर्व आव्हानांवर मात करत रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देण्याचा उपक्रम भाई सथ्था नाईट हायस्कूल आणि मासूम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या तब्बल ५७ विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात संगणकाचे ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही गरज ओळखून मासूम संस्थेच्या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संगणक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये टॅली, ऑफिस असिस्टंट, ग्राफिक डिझाइन, टॅली प्राइम विथ जीएसटी आणि संगणक टायपिंग आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करून रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी मदत होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी आणि आर्मी पब्लिक स्कूलमधील क्रीडा शिक्षक प्रमोद डोंगरे उपस्थित होते. रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

प्रमुख पाहुणे प्रमोद डोंगरे यांनी रात्र शाळेतील आपल्या अनुभवांना उजाळा दिला. ते म्हणाले की, रात्र शाळेत शिक्षण घेत असताना क्रीडा क्षेत्रातून करिअर घडविण्यासाठी शाळेने मोठा आधार दिला. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी जातानाही शाळेने खर्चाची जबाबदारी उचलून सहकार्य केले. रात्र शाळा केवळ शिक्षण देण्याचे काम करत नाही, तर विद्यार्थ्यांना जीवनात स्वतः च्या पायावर उभे करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते, असे त्यांनी नमूद केले.

प्राचार्य सुनील सुसरे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले की, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मासूम संस्थेच्या माध्यमातून अतिरिक्त तास घेतले जातात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रशिक्षणही दिले जात आहे. या संधींचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थी समाजात स्वतःचे स्थान निर्माण करत आहेत.

विद्यार्थ्यांना शिक्षण, शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रात्र शाळा आणि मासूम संस्था एकत्रितपणे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांना प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारी कौशल्ये आत्मसात करता यावीत, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे प्राचार्य सुसरे यांनी सांगितले.

रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी म्हणाले की, रात्र शाळा आणि मासूम संस्था विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. आधुनिक युगातील गरजा लक्षात घेऊन कौशल्याधारित शिक्षण देण्यावर संस्थेचा विशेष भर आहे.

गुणवत्तेच्या बाबतीत आणि विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने आपली संस्था राज्यात आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे आवाहन करताना ते म्हणाले, की शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळालेल्या मदतीची जाणीव ठेवा. संस्थेने मोठ्या अपेक्षेने ही संधी उपलब्ध करून दिली आहे. त्या अपेक्षांचा भंग होऊ देऊ नका. मेहनत, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर आपले भविष्य उज्ज्वल करण्याचे त्यांनी आवाहन केले. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी बाळू गोरडे यांनी वाचून दाखविली.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सचिन जगताप यांच्या निवडीबद्दल मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेतर्फे सत्कार



अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, सतीश ताठे, विकास गीते, अजय कांबळे, विजय कोतकर यांच्यासह पतसंस्थेचे संचालक मंडळ उपस्थित होते. सचिन जगताप यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### मखदुम सोसायटीच्या जुन्या नाणी व नोटांच्या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना इतिहासाची अनोखी सफर

अहिल्यानगर- मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने शहीद अशफाकुल्ला खान व स्वतंत्रता सेनानी बहादूर शाह जफर यांच्या जयंतीनिमित्त पी. ए. इनामदार स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे ऐतिहासिक नाणी व नोटांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना विविध राजवटींमधील चलनांचा इतिहास जाणून घेण्याची अनोखी संधी मिळाली. मुकुंदनगर परिसरासह शहरातील विविध उपनगरांतील शाळांमधील सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट देत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या प्रदर्शनात शिवशाही, निजामशाही, मुघल व ब्रिटिश काळातील नाणी आणि नोटांचा संग्राहक इंजिनियर सचिन डागा यांच्या अनमोल संग्रह मांडण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील नाणी, अहमदनगरच्या ऐतिहासिक राजवटींतील चलन, काश्मिरी राजांची नाणी, ब्रिटिशकालीन शिक्के व नोटा, संस्थानिक राजांची चलने, पोर्तुगीज नोटा, हैदराबादच्या निजामाच्या काळातील नोटा तसेच स्वतंत्र भारतातील जुन्या व नवीन चलनातील नाणी व नोटा विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरल्या. याशिवाय स्मारक नाणी, खोटी नाणी, तांत्रिक त्रुटी असलेली नाणी आणि विविध कालखंडांतील दुर्मीळ चलनप्रकारही प्रदर्शनात पाहण्यासाठी ठेवण्यात आले होते. या ऐतिहासिक संग्रहाची माहिती नाणे व नोटांचे संग्राहक इंजिनिअर सचिन डागा यांनी विद्यार्थ्यांना सविस्तरपणे दिली. प्रत्येक नाणे आणि नोटेमागील इतिहास, त्यावरील चिन्हे, तत्कालीन राजवटी आणि त्या काळातील आर्थिक व्यवहार यांची माहिती जाणून घेताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. पुस्तकांमधून इतिहासाचा अभ्यास करताना अनेकदा केवळ माहिती मिळते; मात्र त्या काळातील प्रत्यक्ष नाणी व नोटा पाहिल्याने इतिहास अधिक जवळून समजतो, याचा अनुभव विद्यार्थ्यांना या प्रदर्शनातून मिळाला.

# माणुसकीचा दिवाळी फराळ! मॅक्स उद्योग समूहाचा ६०० गरजू कुटुंबांना मदतीचा हात

**सचिनदादा नरवडे व इंजि. प्रवीण फलके यांचा स्तुत्य पुढाकार; युवा फाऊंडेशनच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर कुटुंबांना दिवाळी किटचे वाटप**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**ढवळपुरी –** दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि आपुलकीचा सण! मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसमोर सण साजरा करण्याचेही मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा कठीण परिस्थितीत समाजातील गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचे काम मॅक्स उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सचिनदादा नरवडे व युवा उद्योजक इंजि. प्रवीण फलके यांनी केले आहे. त्यांच्या पुढाकारातून युवा फाऊंडेशन, ढवळपुरी यांच्या सहकार्याने गावातील तब्बल ६०० गरजू, दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना दिवाळी किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचे दर्शन घडले.

दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात आनंदाचा दिवा लागावा, प्रत्येक कुटुंबाच्या चेहऱ्यावर समाधान दिसावे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणाचेही सणाचे आनंदाचे क्षण हिरावले जाऊ नयेत, या उदात्त हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विशेषतः दुष्काळामुळे शेती व्यवसाय अडचणीत आला असून शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत त्यांना दिवाळीच्या काळात मदतीचा हात देत ६०० कुटुंबांपर्यंत दिवाळी किट पोहोचविण्यात आले. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ किट वाटप करून सामाजिक जबाबदारी पूर्ण न करता, प्रत्येक गरजू कुटुंबापर्यंत मदत पोहोचावी यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. लाभार्थी कुटुंबांची माहिती संकलित करणे, गावातील दुर्गम भागांत घरोघरी जाऊन कूपन वाटप करणे, किट वितरणाची व्यवस्था करणे आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचविणे, अशा विविध जबाबदाऱ्या युवा फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी पार पाडल्या. सर्वांच्या एकजुटीने आणि नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी झाला.

या कार्यक्रमाला मॅक्स उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सचिनदादा नरवडे, युवा उद्योजक इंजि. प्रवीण फलके, उपसरपंच बबन पवार, अमोल ठाणगे, होणाभाऊ घोगरे, ग्रामपंचायत सदस्य संतोष गोयकर, माजी ग्रामपंचायत सदस्य देविदास फलके, बबन राठोड, नंदू गावडे, इंजि. वसंत चितळकर, नंदू वाघ, संतोष थोरात, विश्वनाथ वाघ, गणेश पारखे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बाबाजीशेठ चौधरी, दादाभाऊ व्यवहारे, आसिफ शेख, धनराज चौधरी, गणेश ठोकळ, गोटीराम पवार, भानुदास मोरे, विजय सांगळे, दिनेश चौधरी, बाळशीराम ठोकळ, संपत व्यवहारे, आरिफ शेख, संभाजी नवले, महेश ठोकळ, अभिमन्यू चौधरी, दयाराम चौगुले, केशव वाव्हळ आणि फिरोज शेख आदी उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी बबन काका राठोड, संदीप चव्हाण, कृष्णा आव्हाड, प्रवीण परशुराम जाधव, प्रवीण कनीराम जाधव, रवी पवार, चिमाजी भले, राजू पथवे, संतोष गोयकर, तुषार चौगुले, अबू दरेकर, प्रवीण भनगडे, लहू भनगडे, वैभव खांडके आणि संदीप वाव्हळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

**मदतीच्या हातातून माणुसकीचा प्रकाश!**

आजच्या काळात अनेकजण स्वतःच्या प्रगतीचा विचार करतात; मात्र समाजातील गरजू घटकांच्या अडचणी ओळखून त्यांच्या सणात आनंद निर्माण करण्यासाठी पुढाकार घेणारे हात समाजासाठी प्रेरणादायी ठरतात. सचिनदादा नरवडे आणि इंजि. प्रवीण फलके यांनी ६०० कुटुंबांना दिवाळी किट देऊन केवळ वस्तूंचे वाटप केले नाही, तर त्यांच्या घरात आनंदाचा दिवा पेटविण्याचा प्रयत्न केला आहे.

# दिवाळीपूर्वीच वाहतूक नियोजन करा!

**बसस्थानक, खंडोबा मंदिर चौक, सोनार गल्लीतील कोंडी टाळण्याची नागरिकांची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दिवाळीचा सण जवळ येताच पैठण शहरातील बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर बसस्थानक परिसर, खंडोबा मंदिर चौक आणि सोनार गल्ली या वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पैठण पोलिसांनी आतापासूनच विशेष नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दिवाळीच्या काळात बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होते. त्यात दुचाकी, चारचाकी आणि प्रवासी वाहनांची वर्दळ वाढल्याने शहरातील प्रमुख चौकांसह अरुंद रस्त्यांवर वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो. परिणामी नागरिकांना खरेदीसाठी ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागतो, तर व्यापाऱ्यांच्या व्यवसायावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते.

**गर्दीच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्ताची गरज**

पैठण बसस्थानक परिसर, खंडोबा मंदिर चौक आणि सोनार गल्ली येथे दिवाळीच्या काळात वाहतुकीचा ताण वाढण्याची शक्यता आहे. या ठिकाणी वाहने अस्ताव्यस्त उभी केल्यास कोंडीत आणखी भर पडू शकते. त्यामुळे गर्दीच्या वेळेत पोलीस कर्मचारी तैनात करणे, नो-पार्किंग नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे, बेशिस्त पार्किंगवर कारवाई करणे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी वाहतूक व्यवस्था लागू करणे गरजेचे आहे.

**पोलीस निरीक्षक गोमारे यांनी लक्ष घालावे**

सणासुदीच्या काळात वाहतूक कोंडी झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दिवाळीपूर्वीच नियोजन केल्यास नागरिकांची गैरसोय टाळता येऊ शकते. पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी संबंधित विभागांशी समन्वय साधून गर्दीच्या ठिकाणांचा आढावा घ्यावा आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागू नये, यासाठी पैठण पोलिसांनी वेळीच पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# गोरेगावच्या नरसाळे दाम्पत्याचा विमा क्षेत्रात नावलौकिक!

**रावसाहेब भाऊ नरसाळे यांना पुणे विभागातून प्रथम क्रमांकाचा पुरस्कार; दोहा (कतार) अभ्यास दौऱ्यासाठी निवड**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**गोरेगाव–** मॉडेल व्हिलेज गोरेगावचे सुपुत्र रावसाहेब भाऊ नरसाळे आणि त्यांच्या पत्नी सौ. सविता नरसाळे यांनी विमा क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. सातत्यपूर्ण मेहनत, उत्कृष्ट कामगिरी आणि ग्राहकांचा विश्वास या जोरावर नरसाळे दाम्पत्याने विमा क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.




भारतीय स्टेट बँक लाइफ इन्शुरन्सच्या वतीने रावसाहेब भाऊ नरसाळे यांना *पुणे विभागातून प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अक्कलकोट येथे आयोजित विशेष कार्यक्रमात महाराष्ट्राचे हेड मा. श्री. रविकुमार जगताप यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे, त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्यांची *दोहा, कतार येथील अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे.

पती-पत्नी दोघेही विमा क्षेत्रात कार्यरत असून, एकाच क्षेत्रात मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर यश संपादन करणे ही गोरेगावसाठी अभिमानाची बाब आहे. आपल्या कामाप्रती असलेली निष्ठा, सातत्य आणि व्यावसायिक दृष्टिकोन यामुळे त्यांनी यशाचे हे शिखर गाठले आहे. रावसाहेब नरसाळे यांना मिळालेला विभागीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी झालेली निवड यामुळे त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव झाला असून, मॉडेल व्हिलेज गोरेगावच्या नावलौकिकातही भर पडली आहे. नरसाळे दाम्पत्याच्या या यशाबद्दल गोरेगाव परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# अहिल्यानगर जिल्हा महिला विकास मंडळातर्फे मोफत शिवण वर्गाचा प्रारंभ

**महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी उपक्रम; बाळासाहेब बोराटे यांच्या हस्ते उद्घाटन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजभूषण स्व. श्रीमती रईसा शेख यांनी स्थापन केलेल्या अहमदनगर जिल्हा महिला विकास मंडळाच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने दातांच्या दवाखान्याशेजारी, शतरंजी मस्जिद रोड, हातिमपुरा, धरती चौक, अहिल्यानगर येथे मोफत बेसिक शिवण वर्ग सुरू करण्यात आला. ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या शुभहस्ते या वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.



या कार्यक्रमाला माजी महापौर सुरेखाताई कदम, मंगलाताई लोखंडे, नगरसेवक दत्तात्रय कावरे, फरीदा फारूक आणि सीमा असलम यांची प्रमुख उपस्थिती होती. महिलांना शिवणकामाचे मूलभूत प्रशिक्षण मिळावे, त्यांच्यात कौशल्य विकसित व्हावे आणि या कौशल्याच्या माध्यमातून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने मंडळाने हा उपक्रम हाती घेतला आहे.

आजच्या काळात महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता स्वतःच्या कौशल्याच्या बळावर आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा हेतू आहे. शिवणकामासारखे कौशल्य आत्मसात केल्यास महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याबरोबरच कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नातही हातभार लावता येऊ शकतो. त्यामुळे हा मोफत शिवण वर्ग महिलांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

महिलांना कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच मंडळातर्फे ब्युटी पार्लर कोर्सही ५० टक्के सवलतीत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा कोर्स जाहिदा खान आणि योगिता गीते यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार असून, इच्छुक महिलांना सवलतीच्या दरात ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेता येणार आहे.

# शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरचा संघ प्रथम

**१४ वर्षांखालील मुलांच्या संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.




या स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. संघातील श्री रोडे, श्रेयस हापसे, साई फिरोदे, आण्विक कासार, मिनेश ठाकूर, शिवम नजन, आयुष राठोड, पियुष राठोड, सात्विक शिंदे, आयुष सुतार, साई रोडे, आयुष शिंदे आदी खेळाडूंनी सांघिक कामगिरीच्या जोरावर संघाला विजेतेपद मिळवून दिले.

या सर्व खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा विभागप्रमुख पी. पी. लोंढे सर यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले. खेळाडूंनी केलेल्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि मेहनतीचे हे यश असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

खेळाडूंच्या या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच शालेय समितीचे अध्यक्ष किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या वसुधा जोशी, पर्यवेक्षिका शारदा होशिंग, संघटनेचे सचिव विवेक सूर्यवंशी, प्रियंका बांगर, बोराजी पथवे यांच्यासह प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुणे विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी भाग्यश्री जोशीची निवड; ‘भिंगार स्पोर्ट्स क्लब’चा गौरव

**हैदराबाद येथे राष्ट्रीय स्तरावर खेळणार; डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते मेडल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत भिंगार येथील भिंगार स्पोर्ट्स क्लब (सबका क्लब) ची विद्यार्थिनी कु. भाग्यश्री प्रशांत जोशी हिने पारनेर येथे झालेल्या निवड चाचणीतून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. आता ती हैदराबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार असून, तिच्या या यशामुळे भिंगारच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

भाग्यश्री ही छावणी परिषद संचलित पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक शाळेत इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत आहे. तिने ६० मीटर धावणे, ६०० मीटर धावणे, लांब उडी आणि भालाफेक अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये सराव व तयारी केली आहे. भिंगार स्पोर्ट्स क्लबचे प्रशिक्षक मेजर विठ्ठल काळे आणि राष्ट्रीय खेळाडू शंकर औरंगे यांनी तिला मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे भाग्यश्रीला राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळाली आहे.

भाग्यश्रीच्या या यशाबद्दल स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते तिला मेडल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी तिच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे, भिंगार स्पोर्ट्स क्लबचे आणि अहिल्यानगरचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना योग्य प्रशिक्षण आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारू शकतात, याचे भाग्यश्री जोशी हे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

## नामांकित मल्ल ह.भ.प. काशिनाथ फलके पाटील यांचे निधन

**कुस्ती, भजन आणि अध्यात्म क्षेत्रातील योगदानाची आठवण; ढवळपुरी परिसरात हळहळ**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**ढवळपुरी –** रानमळा, ढवळपुरी येथील ज्येष्ठ नागरिक, नामांकित मल्ल व वारकरी संप्रदायाचे सेवक ह.भ.प. काशिनाथ रभाजी फलके पाटील (वय ९०) यांचे दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.२० वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

फलके पाटील हे तरुणपणी जिल्ह्यातील नामांकित पहिलवान म्हणून परिचित होते. त्यांनी अनेक नामांकित मल्लांना कुस्तीच्या आखाड्यात चितपट केले होते. पुढील काळात त्यांनी अध्यात्माची वाट स्वीकारत भजन, कीर्तन आणि वारकरी संप्रदायाच्या सेवेत स्वतःला वाहून घेतले. पेटीवादन आणि सुरेल भजनगायनामुळे ते पंचक्रोशीत दादा म्हणून लोकप्रिय होते.

सन १९७० च्या कालखंडात ते ग्रामपंचायत सदस्य म्हणून मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते. शेती आणि दुग्धव्यवसायातही त्यांनी यशस्वी कामगिरी केली. कुस्ती, सामाजिक कार्य आणि अध्यात्म अशा विविध क्षेत्रांतील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, नातवंडे आणि मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसराने एक ज्येष्ठ मार्गदर्शक आणि भजनसेवक गमावला आहे.

# आ. दातेंच्या वाढदिवसाचा जल्लोष टाळत मुक्या जीवांच्या सेवेला प्राधान्य

## स्व. अजितदादांच्या निधनाचे दुःख व दुष्काळ लक्षात घेऊन सेवाभावी उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** आ. दाते सरांचे वाढदिवसाचा जल्लोष न करता मुक्या जीवांच्या सेवेतून नेत्यावरील प्रेम व्यक्त करण्याचा अनोखा उपक्रम पारनेर तालुक्यात राबविण्यात आला. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली शोकाकुल परिस्थिती आणि दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार काशिनाथ दाते सर यांनी वाढदिवस साजरा न करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या भूमिकेचा मान राखत समर्थकांनी शुभेच्छांच्या औपचारिकतेपेक्षा सामाजिक सेवेचा मार्ग निवडला.

पिंपळगाव रोठा येथील श्री कोरठण देशी गाय जतन संस्था, गोशाळेत पशुधनासाठी चारा व पाणी वाटप करून हा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. प्रदीप दाते यांच्या नेतृत्वाखाली उद्योजक नंदु खामकर आणि मित्रपरिवाराने या सेवाकार्याचे आयोजन केले. दुष्काळामुळे ग्रामीण भागात चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर होत असताना त्याचा फटका मुक्या जनावरांनाही बसत आहे.

अशा परिस्थितीत गोशाळेतील पशुधनाची गरज ओळखून मदतीचा हात पुढे करणे, हीच या उपक्रमाची खरी जमेची बाजू ठरली. वाढदिवसानिमित्त होणारा उत्सव बाजूला ठेवून गरजू जीवांच्या सेवेला प्राधान्य देत आयोजकांनी सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश दिला. नेत्यावरील प्रेम केवळ घोषणांतून नव्हे, तर कृतीतूनही व्यक्त करता येते. दुःखाच्या प्रसंगी संयम आणि दुष्काळाच्या काळात सेवाभाव जपत राबविण्यात आलेला हा उपक्रम वाढदिवसाचे सामाजिक औचित्य साधणारा ठरला.

यावेळी आर. एस. कापसे सर, भास्कर उचाळे सर, सुरेश परंडवाल, सौ. रेश्माताई गलांडे, डॉ. प्रदीप दाते, नंदकिशोर खामकर, मच्छिंद्र गलांडे, कृष्णा मुरवदे, बापू खंदारे, राहुल येणारे, गणेश वाळूंज, स्वप्नील वाळूंज, विठ्ठलराव मोरे, प्रवीण उचाळे उपस्थित होते. जल्लोषापेक्षा जीवदया आणि औपचारिक शुभेच्छांपेक्षा सेवाकार्य श्रेष्ठ, हा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून दुष्काळाच्या कठीण परिस्थितीत माणुसकीचा ओलावा जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# पाण्याच्या बचतीला सर्वोच्च प्राधान्य – डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

## मुळा प्रकल्प कालवा सल्लागार समितीची बैठक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मुळा प्रकल्पाच्या उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने आणि कार्यक्षम वापर करण्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे सूक्ष्म नियोजन करावे. पाणी उपलब्ध करून देताना पाणीवापराचे योग्य नियोजन, वितरणातील कार्यक्षमता आणि पाण्याची बचत यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

मुळा प्रकल्प कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत प्रकल्पाच्या पाणीवापराचे नियोजन आणि कालव्यांद्वारे पाणी वितरणासंदर्भातील विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी आमदार प्राजक्त तनपुरे, विठ्ठल लंघे, हेमंत ओगले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पाण्याचे महत्त्व लक्षात घेता उपलब्ध जलसाठ्याचा योग्य विनियोग होणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. पाणी वितरण प्रक्रियेत समन्वय राखून उपलब्ध पाण्याचा योग्य उपयोग होईल, याची दक्षता घ्यावी, असेही मंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी मुळा प्रकल्प सिंचन क्षेत्र, लाभक्षेत्रातील पर्जन्यमान, सन २०२६–२७ खरीप हंगाम पाणी वापर तसेच पाण्याचे नियोजन याविषयी सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती दिली. सन २०२६–२७ रब्बी हंगामासाठी शिल्लक पाण्याचे नियोजन मुळा उजवा कालवा बंधाऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी–जानेवारी २०२७ ते मार्च २०२७ – आवर्तन १ वेळा मुळा डावा कालवा– जानेवारी २०२७ ते मार्च २०२७– आवर्तन २ वेळा.

# विद्यार्थ्यांनी आई–वडिलांच्या घामाचा विसर पडू देऊ नये – विलास बडे

## कै. सुनीताताई एकनाथराव ढाकणे यांच्या २२ व्या पुण्यस्मरणानिमित्त ढाकणे शैक्षणिक संकुलात विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी येथे संस्थेच्या प्रेरणास्थान कै. सौ. सुनीताताई एकनाथराव ढाकणे यांच्या २२ व्या पुण्यस्मरणानिमित्त गुरुवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे होते.

यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून आयबीएन लोकमतचे उपसंपादक विलास बडे, शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे विभागीय उपसचिव गौरव देहाडे, डॉ. सोमनाथ बडे, शुभांगी बडे, श्रीकांत एकनाथ ढाकणे, ऋषिकेश एकनाथ ढाकणे, जया एकनाथ ढाकणे, प्रशांत जामोदे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, साधुसंत, महंत आणि संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आई–वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून ध्येयासाठी मेहनत करा – विलास बडे**

'स्पर्धा परीक्षा आणि बदलते शैक्षणिक वारे' या विषयावर मार्गदर्शन करताना विलास बडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरच्या संधी ओळखून ध्येय निश्चित केले पाहिजे. यश मिळविण्यासाठी आजपासूनच सातत्याने मेहनत घेणे आवश्यक आहे. आई–वडील आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अपार कष्ट घेत असतात. त्यांच्या घामाचा आणि त्यागाचा विद्यार्थ्यांनी कधीही विसर पडू देऊ नये. आई–वडिलांनाच आपले पहिले गुरू मानून त्यांच्या मार्गदर्शनानुसार वाटचाल केली, तर यश निश्चित मिळू शकते. आज मेहनत केली नाही, तर भविष्यात पश्चात्ताप करण्याची वेळ येऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

शासन विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक योजना राबवत असून विद्यार्थ्यांनी या योजनांची माहिती घेऊन त्यांचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संकुल उभारून डॉ. एकनाथराव ढाकणे यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या कार्याला सलाम करून सर्वांनी या शैक्षणिक कार्याला सहकार्य करावे, असेही बडे यांनी नमूद केले.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रविकांत तुपकर यांची आक्रमक भूमिका**

यावेळी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडली. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक न झाल्यास शासनाविरोधात संघर्ष करण्याची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

**ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे हीच प्राथमिकता – डॉ. एकनाथराव ढाकणे**



(छाया : बाबा पालवे)

अध्यक्षीय भाषणात डॉ. एकनाथराव ढाकणे यांनी संस्थेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना माफक शुल्कात दर्जेदार उच्च शिक्षण उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांचे हित जपणे ही संस्थेची प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात राक्षी येथे एक आदर्श शैक्षणिक केंद्र उभारून या परिसराची ओळख 'शैक्षणिक पंढरी' म्हणून निर्माण करण्याचा संस्थेचा मानस आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक आणि सर्व हितचिंतकांनी संस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**गौरव देहाडे यांनी केले विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे विभागीय उपसचिव गौरव देहाडे यांनी ढाकणे शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे आणि त्यांच्या उज्ज्वल कामगिरीचे कौतुक केले. ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी देण्याचे संस्थेचे कार्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

**शैक्षणिक दिंडी, रक्तदान शिबिर आणि डिजिटल लायब्ररीचे उद्घाटन**

कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. सुनीताताई एकनाथराव ढाकणे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राक्षी येथून महाविद्यालयापर्यंत शैक्षणिक दिंडी काढण्यात आली. सकाळी अकरा वाजता मान्यवरांच्या हस्ते संकुलाच्या प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. तसेच डिजिटल लायब्ररी आणि सेंट्रल लायब्ररीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सुनीताताई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देणगी व भेटवस्तूंचे वितरणही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. हर्षा ऋषिकेश ढाकणे यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे संयोजन युवा पत्रकार निलेश पर्वत यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीकांत ऋषिकेश ढाकणे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कै. सुनीताताई एकनाथराव ढाकणे यांच्या स्मृतींना अभिवादन करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक जाणीव आणि उज्ज्वल भविष्याची दिशा देण्याचा संकल्प या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

# पहिल्या राज्यस्तरीय लुडो स्पर्धेत छत्रपती अकॅडमीची चमकदार कामगिरी; १ सुवर्ण, २ रौप्य, १ कांस्य पदकावर नाव




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**आळंदी / अहिल्यानगर** – माऊली सभागृह, आळंदी येथे रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडलेल्या पहिल्या राज्यस्तरीय लुडो स्पर्धेत अहिल्यानगरच्या छत्रपती अकॅडमी ने घवघवीत यश संपादन केले आहे.

लुडो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने झालेल्या या स्पर्धेत नागपूर, नांदेड,पिंपरी चिंचवड, मावळ, पुणे, गोंदिया, अहिल्यानगरसह अनेक जिल्ह्यांतून खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष श्री. निवृत्ती काळभोर, सचिव श्री. रवि बारापत्रे, सहसचिव श्री. नारायण कराळे ,अंजली दळवी आंतरराष्ट्रीय खेळाडू, सुभाष देवकाते यशस्वी विद्यालय चे संस्थापक व अध्यक्ष, अपर्णा तापकीर, महादेव फफाळ, रविंद्र गारगोटे , विनय चव्हाण, प्रशांत रणखांब , प्रवीण पाल,अंकुश सकपाळ, सुखराम प्रजापती,राहुल रगडे,आराधना निवले, भाग्यश्री गायकवाड इत्यादी मान्यवरांच्या यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत छत्रपती अकॅडमीच्या खेळाडूंनी ४ पदके पटकावत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

पदक विजेते खेळाडू:
सुवर्णपदक – कु. गार्गी झिने, रौप्यपदक – कु. आराध्या कराळे, रौप्यपदक – श्री. हरिदास धोत्रे, कांस्यपदक – कु. अलीना शेख

या यशाबद्दल सर्व विजेत्या खेळाडूंचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, अकॅडमीचे प्रशिक्षक व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या खेळाडूंना आमदार श्री. अक्षय दादा कर्डिले साहेब, प्रगतीशील शेतकरी कराळे सुनिल , पोखर्डी गावचे तंटा मुक्ती अध्यक्ष विक्रम भगत व अकॅडमी चे कराळे नारायण सर या सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व आगामी राष्ट्रीय स्पर्धे साठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# राहाता तालुक्यातील मानवता चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**संगमनेर** – राहता तालुक्यातील नामवंत, मानवता चारिटेबल ट्रस्टच्या वतीने नवरात्र उत्सव काळात एक आगळावेगळा आणि समाजात आदर्श निर्माण करणारा अत्यंत स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

संगमनेर तालुक्यातील कासारे गावात असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील १३१ विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

सोमवंशी क्षत्रिय कासार समाज बांधवांचे कासारे गावात श्री कालिका देवी हे कुलदैवत आहे.

श्री क्षेत्र कासारे येथील श्री कालिका देवी मंदिरात सकाळी अष्टमीचा होम करण्यात आला. तसेच महाआरती नंतर फराळ वाटप करण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमानंतर कासारे प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमास

मानवता चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षांसह विश्वस्त मंडळ, श्री कालिका देवी संस्थानचे विश्वस्त व पदाधिकारी या सर्वांसह कासारे ता. संगमनेर येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळेतील शिक्षक कर्मचारी वृंद तसेच केंद्र शाळा प्रमुख श्री प्रवीण खेडकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री शिवाजी अण्णा कारले पाटील, विकास सेवा सोसायटीचे व्हाईस–चेअरमन श्री दादा गायकवाड कार्यक्रमास उपस्थित होते, स्वागत आणि प्रास्ताविक शाळेतील शिक्षक श्री निलेश देशमुख यांनी केले.




पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग असलेल्या या शाळेतील प्रत्येक वर्गातील दोन मुला–मुलींना प्रातिनिधिक स्वरूपात शालेय लेखन साहित्याचे (वह्या, फुटपट्टी, पेनपेन्सिलचे) वाटप मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले. केंद्र शाळा प्रमुख श्री खेडकर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांचे आणि मानवता चॅरिटेबल ट्रस्टचे कौतुक केले. श्री शिवाजी कारले पाटील, श्री राजेंद्र उंडे, प्रा. श्री चंद्रकांत खांडगौरे यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री संदीप किसन कडलग यांनी आभार मानले. सूत्रसंचालन निलेश देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाचे छायाचित्रण श्री संतोष बाळासाहेब रावअंदुरे, लोणी यांनी केले.

मानवता चॅरिटेबल ट्रस्ट ही राहाता तालुक्यात कार्यरत असलेली शासनमान्य सेवाभावी संस्था आहे. या संस्थेस ८० प्रमाणपत्र कर सवलत परवाना मिळालेला आहे. संस्था राबवत असलेले विधायक उपक्रम -- उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती वाटप. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक लेखन साहित्य वाटप. विद्यार्थी पालक आर्थिक मदत योजना. आपत्कालीन मदत व वैद्यकीय मदत.

संपूर्ण समाजात आदर्श निर्माण करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणाऱ्या अशा या मानवता ट्रस्टमध्ये अध्यक्ष श्री नंदकुमार गणपत कोळपकर शिर्डी, खजिनदार श्री दीपक प्रभाकर कुंभकर्ण राहाता, सचिव प्रा चंद्रकांत पुंडलिक खांडगौरे लोणी, विश्वस्त श्री कालिदास बबनराव डंबाळे शिर्डी, श्री रवींद्र बाळासाहेब रावअंदुरे लोणी, श्री उमेश गोविंद कुंभकर्ण शिर्डी यांचा सहभाग आहे.

यांच्यासह श्री कालिका देवी संस्थानचे माजी अध्यक्ष व विश्वस्त श्री अशोकराव नानासाहेब कोळपकर राहुरी, विश्वस्त श्री राजेंद्र मुरलीधर उंडे उंबरे, श्री राजेंद्र दिनकर अंभोरे वांबोरी या मान्यवरांची कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी माननीय मुख्याध्यापकांसह शिक्षक भागवत उकिर्डे, श्री सुनील गुळवे, वैशाली घुले, बाळासाहेब दिघे, निलेश देशमुख, राजश्री भोये यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी श्री कालिका देवी संस्थानचे विश्वस्त श्री राजेंद्र मुरलीधर उंडे, उंबरे यांनी याप्रसंगी वर्गात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला ५१, १०१, १५१, २०१, २५१, ३०१, ३५१/– याप्रमाणे रोख रक्कम वाटण्याचे जाहीर केले.

# नवगाव शिवारात ऊसाला भीषण आग!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण** – पैठण तालुक्यातील नवगाव शिवारात नवगाव–विहामांडवा पाटाशेजारील परिसरातील ऊसाला आग लागल्याची घटना समोर आली आहे. या आगीत सुमारे २५ ते ३० एकर क्षेत्रावरील ऊस जळाल्याची प्राथमिक माहिती असून, या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. ऊस हे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे नगदी पीक आहे. मोठ्या मेहनतीने आणि खर्च करून वाढविलेला ऊस आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने संबंधित शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



**आगीचे कारण अस्पष्ट; पंचनाम्याची अपेक्षा**

नवगाव–विहामांडवा पाटाशेजारील परिसरात लागलेल्या या आगीमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. आगीचे कारण शोधून बाधित क्षेत्राची पाहणी करावी, नुकसानीचे पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नियमानुसार आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, आगीत जळालेल्या उसाचे नेमके क्षेत्र, आगीचे कारण आणि नुकसानीचा अधिकृत तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही.

(पान १ वरुन)

## बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई करा!

निदर्शनास येत असल्याचे त्यांनी सांगितले. टँकरसारखी अवजड वाहने रस्त्यावर धावत असताना त्यांची आवश्यक कागदपत्रे, फिटनेस प्रमाणपत्र आणि विमा वैध आहे की नाही, याची नियमित तपासणी होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रेमदान चौकातील अपघाताशी संबंधित टँकरची कागदपत्रे आणि तांत्रिक स्थिती तपासण्यात यावी. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत वाहतूक पोलिसांनी अधिक गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी निखिल वारे यांनी केली. प्रेमदान चौकातील अपघातामुळे शहरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. निष्काळजी वाहनचालकांवर कठोर कारवाई, अवजड वाहनांची नियमित तपासणी आणि वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास भविष्यात अशा दुर्दैवी घटना टाळण्यासाठी ठोस पावले उचलता येतील, अशी भूमिका नगरसेवकांनी मांडली. दरम्यान, या प्रकरणाची संबंधित प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी तातडीने दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## 'जय भगवान'चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

आदर्श ग्रामपंचायत पुरस्कार : सौंदाळा, ता. नेवासा, आखेगाव, ता. शेवगाव, वंजारवाडी, ता. जिल्हा बीड. आदर्श सरपंच पुरस्कार : सरपंच शरद आरगडे पाटील( सौंदाळा), सरपंच अयोध्या काटे (आखेगाव), वैजीनाथ तांदळे (वंजारवाडी, बीड).

आदर्श शिक्षक पुरस्कार : पंकज मारकड (टाकळी अंबड, ता. पैठण), डॉ. कैलास दौंड (नांदूर निंबादैत्य), संजय राजगुरू (गेवराई नेवासा), डॉ. संतोषकुमार राठोड (सुळे पिंपळगाव, शेवगाव), शितल गोरे (चव्हाणवाडी, शेवगाव). आदर्श शाळा पुरस्कार : तोंडुळी, ता पाथर्डी, चिलेखनवाडी, ता. नेवासे, उमापूर, ता गेवराई नेवासे बुद्रुक, प्राथमिक विद्यामंदिर निर्मलनगर, शेवगाव, प्राथमिक शाळा अकोले, ता पाथर्डी.

## कत्तलीसाठी आणलेल्या दहा गोवंशाची संगमनेरमध्ये एलसीबीकडून सुटका

संगमनेर) या दोघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी आरोपींविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम व प्राण्यांना निर्दयतेने वागविणे कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

## तब्बल ३ लाख नऊ हजारांचा ऐवज लंपास!

परतल्यानंतर घरातील कपाटाचे कुलूप तुटलेले व सामान अस्ताव्यस्त झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर घरातील दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आले. तीन अनोळखी व्यक्तींनी घरफोडी करून दागिने चोरून नेल्याचा संशय व्यक्त करत मंगल गोरडे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. भरदिवसा, घराला कुलूप असल्याची संधी साधून झालेल्या या घरफोडीमुळे परिसरात चिंता व्यक्त होत आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## मुळा धरणातील पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवा!

घनफूट मृतसाठा आणि १२ दशलक्ष घनफूट जिवंत साठा आहे. मुळा धरणाच्या इतिहासात टंचाईसदृश परिस्थितीत एका आवर्तनात एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी खर्च होण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आगामी काळात कोरड्या वातावरणामुळे पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन न केल्यास पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक गंभीर होऊ शकते. अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रासह ग्रामीण भागातील नागरिकांना आगामी टंचाईच्या काळात पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध राहावे, यासाठी संबंधित विभागाला तातडीने पाणी बचतीच्या सूचना द्याव्यात आणि आवश्यक आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले